REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# माध्यमिक स्तरावर मराठी विषयाच्या अध्यापनात संगणक सहाय्यीत अध्यापन पध्दतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास

डॉ. शशिकांत लक्ष्मण तांबे
एम.ए.,एम.एड्.,एम.फिल.,पीएच.डी.
प्र.प्राचार्य, जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग.

## १) प्रास्ताविक :—



१९८६ च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार भारतामध्ये खऱ्या अर्थाने तंत्रविज्ञानाची क्रांती होवून प्रत्येक क्षेत्रामध्ये तंत्रज्ञानाचा विचार होवू लागला. हाच विचार शिक्षण क्षेत्रात देखील पुढे येवू लागला व अध्यापन—अध्ययनामध्ये तंत्रज्ञानाचा वापर होवू लागला सुरूवातीच्या कालावधीमध्ये श्राव्यसाधनांचा वापर अध्यापनामध्ये होवू लागला त्यानंतर दृकश्राव्य साधनांचा वापर होवू लागला. त्यानंतर OHP व Slides व्दारे अध्यापन—अध्ययन होऊ लागले याची परिणामकारकता पाहून सध्याच्या कॉम्प्युटर युगामध्ये मोठया प्रमाणात संगणकाचा वापर अध्ययन—अध्यापन प्रक्रियेमध्ये होताना दिसून येत आहे. आज अनेक वेबसाईटस,यु—टयुब चॅनेल याव्दारे अद्यावत ज्ञानाची व माहितीची देवाण घेवाण सहज शक्य झालेली आहे. त्यानुसार शिक्षकांनी शिकवताना याच संदर्भ ग्रंथासारखा वापर करणे सहज शक्य झाले आहे. विविध मल्टीमिडीया प्रोग्रॅम्सच्या सहाय्याने विविध विषयातील अध्यापन—अध्यायन किंवा शिक्षण सुलभरीतीने होत आहे. यामध्ये सी.डी., फ्लॅपी, पेनड्राईव्ह अशा साधनामध्ये माहिती साठवून माहिती आपल्याला हव्या त्यावेळी उपलब्ध होते व त्याचा शिक्षण प्रक्रियेवर खूपच चांगला परिणाम दिसून येतो.

मराठी भाषा ही राज्य स्तरावरची दळणवळणाची भाषा आहे. म्हणून तिला अनन्यसाधारण महत्व आहे. महाराष्ट्रात ती प्राथमिक स्तरावर इयत्ता १ ली पासून अनिवार्य भाषा म्हणून अभ्यासक्रमामध्ये समाविष्ठ आहे. भाषा शिक्षणासाठी शिक्षकांना अध्यापन करताना व विद्यार्थ्यांना अध्ययन करताना एक प्रभावी माध्यम म्हणून संगणकाचा वापर होतो. तसेच संगणकाव्दारे अध्यापन केल्याने विद्यार्थ्यांची अवधान केंद्रिकरण क्षमता वाढेल व अध्ययनाची आवड निर्माण होईल. सदर संशोधनामुळे विद्यार्थी संगणक सॉफटवेअर स्वत:हाताळू शकतील व विद्यार्थी स्वयंअध्ययन करून ज्ञान वृध्दींगत करतील.

## २) संशोधनाची उदिष्टये :—

१) पारंपारिक पध्दतीने मराठी विषयाच्या अध्यापनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
२) संगणकाच्या सहाय्याने मराठी विषयाच्या अध्यापनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
३) पारंपारिक पध्दती व संगणक सहाय्यीत अनुदेशन पध्दती यांच्या परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## ३)संशोधनाची परिकल्पना :—

पारंपारिक पध्दतीने केलेले मराठी अध्यापन व संगणक सहाय्याने केलेले मराठी अध्यापन यामध्ये फरक नाही.

### ४) संशोधनाची व्याप्ती :—

सदर संशोधनात उस्मानाबद जिल्हयातील भूम तालुक्यातील चिंचपूर ढगे येथील विजय हायस्कूल येथील इयत्ता ९ वी च्या वर्गाचा विचार करण्यात आलेला आहे. तसेच सदर संशोधनात मराठी माध्यमाच्या मराठी विषयाचा विचार करण्यात आलेला आहे.

### ५) संशोधनाची मर्यादा :—

सदर संशोधनात उस्मानाबद जिल्हयातील भूम तालुक्यातील विजय हायस्कूल चिंचपूर येथील इयत्ता ९ वी व्यतिरिक्त इतर इयत्तांचा विचार करण्यात आलेला नाही. तसेच या संशोधनात मराठी विषया व्यतिरिक्त इतर कोणत्याही विषयाचा समावेश केलेला नाही. सदर संशोधनात मराठी विषयाच्या अध्यापनाच्या पारंपारिक अध्यापन पध्दती व संगणक सहाय्यीत अध्यापन पध्दती यांना सोडून इतर कोणत्याही अध्यापन पध्दती विचार करण्यात आलेला नाही.

### ६) संशोधनाची कार्यपध्दती :—

प्रस्तुत संशोधनासाठी संशाधकाने प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे. प्रयोगासाठी संशोधकाने समान क्षमतेच्या प्रायोगिक व नियंत्रित अशा दोन गटांची निवड केली. प्रायोगिक गटास संगणक सहाय्याने अध्यापन केले व नियंत्रित गटास पारंपारिक पध्दतीने अध्यापन केले. प्रायोगिक गटात नियंत्रित गटाच्या तुलनेत कोणते बदल घडून आले याचा अभ्यास केला आहे.

- **प्रायोगिक अभिकल्प :—**

  सदरहू प्रायोगिक संशोधनासाठी संशोधकाने दोन उत्तर गट अभिकल्पाची निवड केली आहे.

- **नमुना निवड**

  विजय हायस्कूल चिंचपूर या शाळेतील इयत्ता ९ वी च्या प्रथम सत्र परीक्षेतील मराठी विषयातील गुणाकावरून समान गुण असलेल्या २०—२० विद्यार्थ्याचे दोन समतूल्य गट केले. नाणेफेक करून प्रायोगिक व नियंत्रित गट ठरविण्यात आले.

- **साधनांची निवड**

  संशोधकास निष्कर्ष काढण्यासाठी वेगवेगळी माहिती गोळा करावी लागते. यासाठी संशोधकाने पूर्व व उत्तर चाचणी या साधनांचा वापर केला आहे.

- **संख्याशास्त्रीय साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी संख्याशास्त्रीय साधन म्हणून सरासरी व 't' मूल्य या साधनांचा वापर केला आहे.

### ७) प्रत्यक्ष कार्यवाही

प्रयोगासाठी निवडलेल्या दोन गट यादृच्छिक निवड उत्तरचाचणी अभिकल्पानुसार प्रत्यक्ष संशोधनाचे कार्य कसे करण्यात आले याचे सविस्तर वर्णन पुढे दिले आहे. प्रत्यक्ष प्रयोग करण्यासाठी प्रथम:मा. मुख्याध्यापक विजय हायस्कुल चिंचपूर यांची परवानगी घेण्यात आली. त्यानंतर शाळेतील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र परिक्षेचे मराठी विषयाचे गुण घेतले. त्यांचा क्रम लावण्यात आला दोन्ही गटाची विद्यार्थ्यांचे गुण समान येतील अशा पध्दतीने त्याची दोन गटात समान विभागणी करण्यात आली. अशा प्रकारे दोन २० — २० विद्यार्थ्यांचे गट तयार केले. त्यानंतर नाणेफेक करून प्रायोगिक व नियंत्रित गटाची विभागणी करण्यात आली.

## ८) संकलत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :—

| गट | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्राप्त शजश | परिकल्पना त्याचा स्विकार |
|---|---|---|---|---|---|
| नियंत्रित | २० | १४.२० | ४.२१ | ३.९५ | |
| प्रायोगिक | २० | १९.०० | ३.३९ | | **त्याज्य** |

यामध्ये उत्तरचाचणीचे प्राप्त माहितीचे विश्लेषण,सारणी, वारंवारीता मध्यमान,टी—चाचणी या संख्याशास्त्रीय पध्दतीने करण्यात आले. इयत्ता ९ वी मराठी अध्यापनाच्या व्याख्यान पध्दती व संगणक सहायने अध्यापन पध्दतीमध्ये संगणक सहाय्यीत अध्यापन पध्दती परिणामकारक आहे. असे अर्थनिर्वचन करण्यात आले.

## ९) निष्कर्ष :—

संशोधकाने संशोधनातील माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण केल्यामुळे प्रायोगीक व नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या संपादन गुणात फरक दिसून आला हा फरक अध्यापन पध्दतीमुळे पडला यातील ठळक निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१) मराठी विषयच्या अध्यापनात व्याख्यान पध्दती फारशी परिणामकारक नाही.

२) मराठी विषयाच्या अध्यापनात संगणक सहाय्यीत अध्यापन पध्दती वापरून अध्यापन केल्यास विद्यार्थ्यामध्ये प्रगती झाल्याचे दिसून येते.

३) मराठी विषयाच्या अध्यापनात संगणक सहाय्यीत अध्यापन पध्दती वापरल्याने विद्यार्थ्यांना कठीण संकल्पना लवकर समजतात.

४) मराठी विषयाच्या अध्यापनात संगणक सहाय्यीत अध्यापन पध्दती अधिक परिणामकारक आहे.

## १०) शिफारशी :—

१) शिक्षकांनी ICT चे प्रशिक्षण घ्यावे.

२) शिक्षकांनी वर्गाध्यापनात ICT चा वापर करावा.

३) शिक्षकांनी ICT स्त्रोत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दयावेत.

४) शिक्षकांनी ICT बाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा.

## संदर्भसूची :—

१) कदम चा.प. (२००७), शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

२) जगताप ह.ना., (२००४) प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि तंत्रज्ञान, चतुर्थ आवृत्ती, पुणे : नित्यनूतन प्रकाशन